# अगरबत्ती केंद्रांच्या माध्यमातून शेकडो महिलांना रोजगार

## जिल्ह्यातील पोर्ला अगरबत्ती केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**गडचिरोली**| दि. १८ (स्थानिक प्रतिनिधी)

**राज्यामध्ये** प्रथमच गडचिरोली जिल्ह्यात वनविभाग व गावातील संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून अगरबत्ती निर्मिती केंद्र सुरू करण्यात आले आहेत. जिल्ह्यात पाच ठिकाणी सदर केंद्र सुरू झाले आहेत. या माध्यमातून शेकडो महिलांना रोजगार मिळाला आहे. नुकतीच जिल्हाधिकारी अभिषेक कृष्णा यांनी पोर्ला येथील अगरबत्ती केंद्रास भेट देवून पाहणी केली.

यावेळी गडचिरोली वनविभागाचे उपवनसंरक्षक मल्लकार्जुन उपस्थित होते. राज्यात प्रथमच गडचिरोली जिल्ह्यात पाच अगरबत्ती निर्मिती केंद्र वनविभाग व संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आले आहे. वडसा वनविभागाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पोर्ला येथे अगरबत्ती निर्मिती केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामध्ये १५



यंत्राच्या सहाय्याने अगरबत्ती तयार केली जात आहे. या माध्यमातून या परिसरातील २० महिलांना रोजगार मिळाला आहे. या केंद्रामध्ये सद्यस्थितीत १५ यंत्र बसविण्यात आले आहेत. आणखी १०० यंत्रे लावण्याची वनविभागाची योजना आहे. परंतु जागेअभावी हे शक्य होत नसल्याचे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना सांगण्यात आले.

तसेच तुलतुली प्रकल्पाचे रिकामे असलेले गोडावून या अगरबत्ती प्रकल्पाच्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी जिल्हाधिकारी अभिषेक कृष्णा यांच्याकडे करण्यात आली. यावेळी पोर्ला येथील संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुधीर सुरणकर, सरपंच जीवन निकुरे, उपसरपंच बापू फरांडे, मेनेवार यांच्यासह पोर्ला येथील वनपरिक्षेत्राधिकारी आर. एस. बोडे व वनकर्मचारी उपस्थित होते.

जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या या पाच अगरबत्ती निर्मिती केंद्रामुळे महिलांना रोजगार मिळाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या केंद्रांमध्ये जास्तीत जास्त यंत्र बसवून अधिक महिलांना कसा रोजगार देता येईल, याकडे वनविभागाने लक्ष द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. पोर्ला येथील या अगरबत्ती निर्मिती केंद्रास पुरेशी जागा नसल्याने अडचण होत असल्याचे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. प्रशासनाकडून तुलतुली प्रकल्पाचे रिकामे गोडावून या निर्मिती केंद्रास देण्याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.